# निशाणी क्र. ०५ वरील आदेश

सदर प्रकरणात अर्जदारांनी प्रस्तूत अर्जाव्दारे आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे गैरअर्जदार यांच्या विरूध्द तत्पुरता मनाई हुकूम मिळावा अशी विनंती केली आहे.

**अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे :**

०२. अर्जदारांनी वाद मिळकतीबाबत १/२ हिश्याची वाटणी करून स्वतंत्र ताबा मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. सदर अर्जाव्दारे अर्जदारांनी गैरअर्जदारांविरूध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळावा यासाठी अर्ज दाखल केला असून नमुद केले की, अर्जदार क्र. १ हिचा पती नामे विश्वास साहेबराव गाडेकर हा दिनांक १७.०१.२०१३ रोजी मयत झालेला आहे. गैरअर्जदार क्र. १ व २ यांना अर्जदार क्र. १ चे मयत पती व गैरअर्जदार क्र. ३ संतोष ही दोन मुले, गैरअर्जदार क्र. ५ अनिता, गैरअर्जदार क्र. ६ सविता व गैरअर्जदार क्र. ७ रेणूका अशी आपत्य आहेत. गैरअर्जदार क्र. ५ ते ७ यांचे लग्नकार्य व शिक्षण गैरअर्जदार क्र. १ ते ३ व अर्जदाराचे मयत पती नामे विश्वास यांनी केलेले आहे. गैरअर्जदार क्र. ५ ते ७ यांना प्रत्येकी १ लाख रूपये दिलेले असून त्यांनी दाव्यातील मिळकतीतील आपले हक्क साक्षदारासमक्ष तोंडी सोडून दिलेले आहेत. गैरअर्जदार क्र. ५ ते ७ यांनी त्यांचा हक्क सोडून दिला असल्याने संपुर्ण मिळकतीमध्ये अर्जदारांचा १/२ हिस्सा आहे. अर्जदार क्र. १ हिचा पती नामे विश्वासचे निधनाचे वेळी अर्जदार क्र. २ ही फक्त एक वर्षाची होती. अर्जदार क्र. १ चे पती नामे विश्वासचे निधनानंतर गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ सुनिता व तिची मुलगी अर्जदार क्र. २ श्रध्दा यांना मारहाण करून अंगावरील कपडयानिशी घराबाहेर काढून दिले व तेव्हापासून अर्जदार ही तिच्या मुलीसह माहेरी वडीलांचे आश्रयास आली व हालअपेष्टाचे जिवन जगत आहे. तसेच गैरअर्जदारांनी त्यांची

औषधपाणी, कपडालत्ता, भरण पोषण व ईतर कोणतीही चौकशी केलेली नसून त्यांना भेटण्यास देखील आलेले नाहीत.

०३. अर्जदार व तिचे आई—वडिलांनी बरेच वेळा गैरअर्जदारांना समजावून अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नसल्याने त्यांचे हिश्याची जमीन वाटणीकरून द्या अशी विनंती केली परंतू त्यांनी जुमानले नाही व अर्जदारांना जमीन वाटून देण्यास व त्यांचा सांभाळ करण्यास नकार दिला. मौजे पिंपळगाव शेरमुलकी येथील जमीन गट क्र. १६९ क्षेत्रफळ ४० आर तसेच गट क्र. १६७ क्षेत्रफळ ३ हेक्टर ही जमीन गैरअर्जदार क्र. २ चे नावावर एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातुन मेहनत मशागत करून विकत घेतलेली आहे. सदरील मिळकती हिंदू एकत्र कुटूंबाच्या संयुक्त मालमत्ता असुन एकत्रीतपणे उपभोग घेत आहे व ते संयुक्त कब्जेदार आहेत. गट क्र. १६९ क्षेत्रफळ ४० आर व गट क्र. १६७ क्षेत्रफळ ३ हेक्टर ही अविभक्त मिळकत असून अर्जदार क्र. १ व २ हे गैरअर्जदारांचे हिंदु एकत्र कुटूंबाचे सहदायी आहेत व त्यांच्यात अद्याप कोणत्याही प्रकारच्या वाटण्या झालेल्या नाहीत. अर्जदार, तीचे भाउ व मामा यांनी दिनांक १३ जुन २०१८ रोजी मौजे पिंपळगाव शेरमुलकी येथे जावून वाद जमीनीमध्ये वाटणी करून ताबा देण्याविषयी विनंती केली परंतु सर्व गैरअर्जदारांनी अर्जदार हिस मारहाण केली व शेताबाहेर काढून तुला एक गुंठा जमीनसुध्दा मिळणार नाही व वादजमीनी हस्तांतरीत करण्याची धमकी दिली. गैरअर्जदार क्र. २ आशाबाईने तीचे नावावरील जमीन असल्याचा गैरफायदा घेवून वाद जमीनी हस्तांतर केल्या तर अर्जदारांवर उपासमार येईल व अर्जदारांचे कधीही न भरून येणार नुकसान होईल. त्यामूळे वादमिळकतीमध्ये गैरअर्जदार क्र. २ आशाबाई साहेबराव गाडेकर हिने कोणत्याही प्रकारे गहान दान विक्री करून हस्तांतर करू नये असा गैरअर्जदार यांच्या विरूध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळावा अशी विंनती केलेली आहे.

०४. गैरअर्जदारांचे सदर अर्जावरील म्हणणे असे की, अर्जदारांचे व गैरअर्जदारांचे नातेसंबंध व गैरअर्जदार क्र. ५ ते ७ यांचे लग्न गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी केल्याचे मान्य केले व याव्यतीरीक्त ईतर कथन स्पष्टपणे नाकारले. गैरअर्जदारांचे पुढे म्हणणे असे की, वाद मिळकत ही अर्जदार किंवा गैरअर्जदार यांची वडीलोपार्जीत मिळकत नाही व एकत्र कुटूंबात अर्जदार किंवा गैरअर्जदार यांनी मेहनत मशागत करून खरेदी केलेली नसून गैरअर्जदार हिला तिचे आई—वडिलांनी स्त्रीधन म्हणून खरेदीखत क्र. १५५७/१९८२ व १४९८/१९८८ आधारे खरेदी करून दिलेली असल्याने वाद मिळकत त्यांची स्वतंत्र मालकीच्या आबाधीत कायम मिळकती आहेत. त्यामुळे गैरअर्जदारांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०५. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांची कथने व सविस्तर युक्तीवादवरून खालील मुद्दे उपस्थीत होतात व त्यावरील निष्कर्ष हे मी त्यापुढे नमुद केलेल्या कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी दावा हा अर्जदारांच्या बाजुने असल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ? | होय |
| २. | न्यायाचा समतोल हा अर्जदारांच्या बाजूने आहे काय ? | होय |
| ३. | मनाई हुकूमाचा आदेश त्यांच्या बाजूने न झाल्यास अर्जदाराचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | होय |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजूर |

## कारणमिमांसा

०६. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या वकिलांचे लेखी म्हणणे व सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ ते ३ करीताः**

०७. वरील मुद्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रीत चर्चीले जात आहे.

०८. कायद्याची स्थापीत स्थिती अशी आहे की, तात्पुरता मनाई हुकूमाकरीता प्रथमदर्शनी दावा व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असून मनाई हुकूम न मिळाल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे, या तिन्ही बाबी अर्जदाराने सिध्द करणे गरजेचे आहे.

०९. अर्जदार व गैरअर्जदारांनी दाखल केलेला प्रथमदर्शनी पुरावा, अर्जदारांनी गट क्र. १६७ व गट क्र. १६९ चे ७/१२ उतारे व इतर कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच गट क्र. १६७ व गट क्र. १६९ मधील ७/१२ उता—यानुसार अर्जदार यांच्या मालकीची शेतजमीन गट क्र. १६७ व गट क्र. १६९ मध्ये असल्याचे दिसून येते. अर्जदार यांनी दाखल केलेली कागदपत्रे तपासली असता असे निदर्शनास येते की, आज रोजी वाद मिळकत ही गैरअर्जदार हिच्या नावे असल्याची नोंद ७/१२ उता—यात आहे. मनाई हुकूम न मिळाल्यास अर्जदारांचे नुकसान होवू शकते, याउलट गैरअर्जदारांचे काहीही नुकसान होणार नाही.

१०. उपरोक्त विवेंचनावरून अर्जदारांनी प्रथमदर्शनी दावा व न्यायाचा समतोल त्याच्या बाजुने असल्याचे सिध्द केले आहे. तसेच मनाई हुकूम न मिळाल्यास अर्जदार हिचे अपरिमीत नुकसान होणार आहे. म्हणून मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ करीताः**

११. मुद्दा क्र. १ ते ३ वरील निष्कर्षा अन्वये अर्जदार हे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यास पात्र ठरतात. करीता मी खलील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. दाव्याचा निकाल लागेपर्यत गैरअर्जदार किंवा त्यांच्या मार्फत कोणीही मौजे पिंपळगाव शेरमुलकी, ता. भोकरदन जि. जालना येथील वाद मिळकत गट क्र. १६७ क्षेत्रफळ १६ हेक्टर ४० आर पोटखराब २३ आर पैकी गैरअर्जदार याच्या नावावरील ३ हेक्टर त्यामधील असलेल विहीरीसह जमीन जीची चतु:सिमा पुर्वेस : भगवान व अशोक रगडे यांची जमीन, पश्चिमेस : रामराव खरात यांची जमीन, दक्षिणेस : रामधन गाडेकर व कडुबाई खरात, उत्तरेस : आशाबाई गाडेकर गैरअर्जदारांच्या नावावरील जमीनी व वाद मिळकत गट क्र. १६९ क्षेत्रफळ ६ हेक्टर ८८ आर पैकी ४० आर जमीन जीची चतु:सिमा पुर्वेस : शिवाजी धुराजी गटकाळ यांची जमीन, पश्चिमेस : रावसाहेब गावंडे यांची जमीन, दक्षिणेस : गैरअर्जदार आशाबाईचे नावावरील गट क्र. १६७ मधील व उत्तरेस : लालसिंग चंदवाडे व विठ्ठल राजपुत अशा असून उपरोक्त दोन्ही जमीनी गैरअर्जदार आशाबाई साहेबराव गाडेकर हिने कोणत्याही प्रकारे गहान, दान, विक्री करूनल हस्तांतर करू नये असा तात्पुरता मनाई हुकूम प्रस्तूत दाव्याच्या निकालापर्यत देण्यात येतो.

स्वाक्षरित/—
( एस. एस. बजाज )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
भोकरदन. (कार्ट क्र. १)

दिनांक: १५.१०.२०२०.

Shital Shriram Bajaj
Digitally signed by Shital Shriram Bajaj
Date: 2020.10.16 13:45:03 +0530

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी. डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | यु. आर. दसरे |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन |
| मा. साहेबांनी चेक केले<br>व पी. डी. एफ. दिनांक | : | १५.१०.२०२०. |

स्वाक्षरित/—
लघुलेखकाची सही